# मुंबई लोहमार्ग पोलीस मुख्यालय, घाटकोपर जलतरण तलाव, फुटबॉल मैदान व सिंथेटीक ॲथलेटिक्स ट्रॅक बाबतची नियमावली

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडील पत्र क्र.पोमसं/२८-अे/४९३७/ पो.क.नि. नियमावली/ १४९/२०१८ मुंबई दि.०४/१०/२०२२ अन्वये पोलीस कल्याणनिधीची सुधारित नियमावली प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या घटकाच्या आस्थापनेवरील मुख्यालय घाटकोपर येथे पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड मुंबई यांच्या संयुक्त सहकार्याने वेगवेगळया प्रकारच्या खेळाची मैदाने व पोलीस जलतरण तलाव विकसित केलेले आहे.

लोहमार्ग मुंबई पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार तसेच मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी हे कामाच्या व्यापातून तणावातून मुक्त होऊन शारिरिक व मानसिक दृष्टया सदृढ व्हावेत व त्यांची मुले जलतरण क्षेत्रात व क्रिडा विभागात प्राविण्य मिळवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकीक मिळवावे हे मुख्य उददिष्ट आहे. तसेच सदर मैदान व जलतरण तलाव खाजगी व्यक्ती यांना भाडे तत्वावर दिल्यास पोलीस कल्याण निधी मध्ये वाढ होण्यास मदत होईल.

पोलीस कल्याण निधीचे उत्पन्न स्त्रोत वाढविण्यासाठी व सदर मैदानांवर देखरेख ठेवण्यासाठी खालील दर्शविल्याप्रमाणे व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई | अध्यक्ष |
| २ | पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ | सदस्य |
| ३ | पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ | सदस्य |
| ४ | सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) | सदस्य |
| ५ | पोलीस निरीक्षक, मानवी संसाधन शाखा | सदस्य |
| ६ | राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय | सदस्य |

- **सभासदत्व :-**

  अ) वैयक्तीक सभासदत्व : एका व्यक्तीकरिता

  ब) कुटूंब : कुटूंब म्हणजे पती, पत्नी व दोन मुले २१ वर्षाचे आतील.

  क) वैदयकियदृष्टया पात्र

  ड) महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सेवेत असताना व निवृत्त झाल्यानंतरचे सर्व पोलीस अधिकारी / अंमलदार तसेच त्यांचे कुटूंब व केंद्र व राज्य व निम-शासकीय वर्ग-१ चे अधिकारी व त्यांचे नातेवाईक मित्रमंडळी तसेच खाजगी व्यक्तीस सभासदत्व देण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला आहेत.

  इ) पाहूणे सभासद हे सभासदांबरोबरच पाहिजेत व त्यांनी ठरवून दिलेली रक्कम भरुन पावती स्वीकारणे सक्तीचे असून त्यांना १ तास पोहण्यास मिळेल. विहित नमुन्यातील अर्जासह प्रत्येकी २ छायाचित्र देणे आवश्यक आहे.

- **तरण तलावाचे सभासदत्वाचे दर / शुल्क खालीलप्रमाणे :**

| | पदनाम | दर |
|---|---|---|
| १ | लोहमार्ग मुंबई पोलीस दलात कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदार, सेवानिवृत्त, प्रतिनियुक्तीवर असलेले अधिकारी व अंमलदार तसेच मुंबई लोहमार्ग पोलीस दलातून कर्तव्य करुन इतर | प्रति कुटूंब रु.१०००/- प्रति वर्ष<br>प्रति व्यक्ती रु.१००/- प्रति माह |

| | | |
|---|---|---|
| | घटकात बदलून गेलेले अधिकारी व अंमलदार यांना व त्यांच्या कुटूंबातील एका व्यक्तीस **(पोलीस निरीक्षक ते पोलीस शिपाई)** | |
| २ | सहाय्यक पोलीस आयुक्त ते पोलीस महासंचालक, सेवानिवृत्त व प्रतिनियुक्ती वरील पोलीस अधिकारी त्यांच्या कुटूंबाकरीता किंवा कुटूंबातील एका व्यक्तीस | प्रति कुटूंब रु.१०,०००/- प्रति वर्ष<br>प्रति व्यक्ती रु.१०००/- प्रति माह |
| ३ | लोहमार्ग मुंबई नियुक्ती असलेले राज्य व केंद्र शासनाचे वर्ग १ चे अधिकारी, निवृत्त अधिकारी (वैयक्तीक) व यांच्या कुटूंबाकरीता किंवा कुटूंबातील एका व्यक्तीस | प्रति कुटूंब रु.७,५००/- प्रति वर्ष<br>प्रति व्यक्ती रु.१५००/- प्रति माह |
| ४ | खाजगी व्यक्ती (वैयक्तीक) व यांच्या कुटूंबाकरीता किंवा कुटूंबातील एका व्यक्तीस | प्रति कुटूंब रु.५०,०००/- प्रति वर्ष<br>प्रति व्यक्ती रु.२५००/- प्रति माह |
| ५ | पोलीसांचे पाहूणे व खाजगी पाहूणे | रु.२००/- प्रति दिन |
| ६ | मुंबई मधील महाविदयालयाने शाळा व इतर संस्था, येथून मुले, मुली पोहण्यासाठी शिकण्यासाठी तलाव प्रति तास तत्वावर | प्रत्येकी रु.५०/- प्रमाणे |

**लोहमार्ग मुंबई जलतरण तलावाचे वापरांबाबत नियम खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत.**

टीप १ :- वय २१ वर्षावरील परंतू ३० वर्षापर्यतच्या पोलीसांच्या मुलांना रु.३०००/- व ३० वय वर्षावरील पोलीस पाल्यांस खाजगी सभासदत्व दर लागू राहतील.

टीप २ :- मा. पोलीस महासंचालक सो ा. व मा. पोलीस आयुक्त सो ा. यांच्या २१ वर्षाच्या आतील नातवंडाना पोलीस सभासदाप्रमाणे प्रवेश देण्याची तरतुद आहे.

टीप ३ :- शाळेतील मुलांसाठी प्रत्येक वेळी, प्रत्येक तासाला, प्रत्येक विदयार्थीकडून रु.५०/- आकारण्यात येत आहे. ती फी शाळेकडून मिळते आहे.

टीप ४ :- महाराष्ट्र पोलीस वाटरपोलो खेळाडू सरावासाठी जलतरण तलावाचा वापर विनामुल्य करतात. लोहमार्ग मुंबई जलतरण संघ व महाराष्ट्र पोलीस जलतरण / वॉपर पोलो संघ यांना जलतरण तलावाचा वापर विनामुल्य करण्याची तरतुद आहे.

**१.** मुंबई लोहमार्ग पोलीस मुख्यालय जलतरण तलावाचे सर्व सभासदांनी वैदयकिय प्रमाणपत्र आणणे सक्तीचे राहील. यामध्ये चामडी रोग, संसर्गजन्य रोग व अन्य रोग नसल्याबाबत व शारिरिक सक्षमता असल्याचे नमुद असणे सक्तीचे राहिल. हे प्रमाणपत्र वषातून (नूतनिकरण करतेवेळी) १ वेळा देण्यात यावे. जर कोणी सभासदास काही आजारपण आढळून आल्यास त्यांनी स्वत:हून जलतरण तलावाचा वापर थांबवावा.

**२.** पोहता येते अशा सभासदांची पोहण्याची चाचणी घेण्यात येईल.

**३.** शिकाऊ जलतरण पटटूंनी ठरवून दिलेल्या वेळेतच व प्रशिक्षक हजर असतानाच पाण्यात उतरावे.

**४.** सर्व सभासद व पाहूणे सभासदांनी नियमानूसार पोहण्याचा पोशाख (लायक्रा कपडयाचे कॉरच्युम) तो ही गडद रंगाची घालूनच पाण्यात उतरावे.

**५.** सर्व पोहणा-यांनी पाण्यात उतरण्यापूर्वी शॉवर घेणे व पाय स्वच्छ करणे आवश्यक आहे.

**६.** सर्व महिला व पुरुषांपैकी लांब केस असलेल्या पोहणा-यांनी पोहण्याची टोपी (स्विमिंग कॅप) घालणे आवश्यक आहे.

**७.** पोहण्यास येणा-यांनी अधिकृत ओळखपत्र व पाहूणे सभासद असल्यास योग्य ती फी भरुन पावती दाखविल्या शिवाय जलतरण तलावात प्रवेश करता येणार नाही.

**८.** पाहूणे सभासदांना प्रवेश मिळण्याकरीता लोहमार्ग मुंबई जलतरण तलाव येथील सभासद सोबत असणे गरजेचे आहे.

९. सर्व लहान मुलांनी आपल्या पालकांची जलतरणास परवानगी असल्याचे पत्र आणावे. त्यांचे बाबतीत काही अनुचित प्रकार घडल्यास त्यास पालक सर्वस्वी जबाबदार राहतील.

१०. जलतरण तलावामध्ये उतरण्यापूर्वी शरिराला कोणतेही तेल व क्रिम लावू नये.

११. जलतरण तलावामध्ये पोहणा-यांनी तलावामधील उपद्रव किंवा प्रदुषण होईल असे वागू नये.

१२. पोहणा-यांनी जलतरण तलावाची मालमत्ता काळजीने हाताळावी जर नुकसान झाल्यास त्याची पुर्ण भरपाई घेण्यात येईल.

१३. सहा वर्षा खालील मुलांना त्यांच्या पालकाशिवाय जलतरण तलावात प्रवेश नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी पालकांची राहील.

१४. गर्दीच्या वेळी जलतरण तलावात १ तासा पेक्षा जास्त वेळ राहता येणार नाही.

१५. जलतरण तलाव येथील जिवरक्षक व प्रशिक्षक यांच्या बरोबर सभासदांनी वाद घालू नये. त्यांनी सांगितलेल्या नियमाचे पालन करावे.

१६. जलतरण तलाव दुरुस्ती करीता किंवा इतर कारणास्तव बंद ठेवण्याचे व सभासदांना तसेच त्यांचे पाहूणे सभासदांना जलतरण तलावाचे सभासद करावयाचे किंवा नाही? याचे अधिकार व्यवस्थापन समितीला आहेत.

१७. व्यवस्थापक समिती कोणत्याही सभासदास योग्य कारणास्तव जलतरण तलावाचे सभासदत्व रदद करण्याचे अधिकार आहेत.

१८. पोहण्यास येणार सभासद व पाहूणे सभासद यांनी कोणत्याही मौल्यवान वस्तू किंवा रुपये घेवून येवू नये. ते गहाळ झाल्यास व्यवस्थापन समिती जबाबदार राहणार नाही.

१९. जलतरण तलावाचे लॉकर्स प्रथम येणा-यास प्राधान्य या तत्वावर देण्यात येईल. लॉकर्स मध्ये वस्तू स्वताच्या जबाबदारीवर ठेवाव्यात.

२०. पाळीव प्राणी जलतरण तलावाचे आवारात आणण्यास मनाई आहे.

२१. ज्यांना जलतरण तलावाचे सभासदत्व स्विकारावयाचे आहे त्याने अर्जा सोबत दोन पासपोर्ट साईज पोटो दयावेत. १८ वर्षाहून कमी वयाच्या सभासदाच्या अर्जावर पालक किंवा आई व वडील यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

२२. सभासद यांनी आपल्या सभासत्वाची मुदत संपण्यापूर्वी सात दिवस अगोदर सभासदत्व नुतनिकरण करुन घेणे आवश्यक आहे.अन्याथा पुन्हा वनीन सभासदत्व स्विकारावे लागेल याची दक्षता सभासदांनी घ्यावी.

२३. सभासदत्व कोणाच्याही नावे हस्तांतरीत करता येणार नाही.

२४. खाजगी किंवा पोलीस सभासदाचे पाहूणे सभासदांना जलतरण तलावामध्ये गर्दी कमी असेल त्याच वेळेत परवानगी देण्यात येईल. त्यांना परवानगी देण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला असतील.

२५. पोहण्यास येणा-या सर्वांनी आपली पादत्राने मांडणी मध्येच ठेवावी.

२६. व्यवस्थापकिय मंडळास जलतरण तलावाचे नियम बदलण्याचे अधिकार आहेत.

२७. सभासदांनी जिव रक्षकांना त्यांच्या पाल्यांना जलतरण शिकवण्यास सांगू नये.

२८. सभासदांनी तलावाच्या भोवती आपला पोषाख ठेवू अथवा बदलू नये.

२९. व्यवस्थापकिय मंडळास तरण तलावाचे नियम बदलण्याचे अधिकार आहेत. पोलीस जलतरण तलावाचे जे सभासद असतील त्यांना तरण तलावाच्या व्यवस्थापनात आपले अभिप्राय देण्याचे अधिकार नसतील.

३०. मध्य पान केलेल्या व्यक्तीस जलतरण तलावात पोहण्यासाठी प्रवेश दिला जाणार नाही.

३१. पोलीस व इतर कोणत्याही १८ वर्षावरील मुलांना पाहूणे सभासद म्हणून प्रवेश मिळण्यासाठी पालकांची परवानगी पत्र स्वाक्षरीसह आणावे. त्याबाबत काही अनुचित प्रकार घडल्यास पालक सर्वस्वी जबाबदार राहतील.

३२. पाहुणे सभासदांना पोहण्यासाठी पोलीस जलतरण तलाव लोहमार्ग मुंबई येथील सभासद असणारा व्यक्ती सोबत येणे गरजेचे आहे. अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

जलतरण तलाव लोहमार्ग , मुंबई जलतरण पटू नियमाबाबत

पोलीस जलतरण तलाव लोहमार्ग मुंबई ही आस्थापना पोलीस अधिकारी व अमंलदार यांना व त्यांच्या पाल्यांना शारीरिक दृष्टया सक्षम राहण्यासाठी तसेच जलतरण व क्रिडा क्षेत्रात राज्य व राष्ट्रीय पालळीवार पदक विजेते होऊन त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात नोकरी व शिक्षणामध्ये प्राविण्य मिळावे या हेतूने बनविण्यात आले आहे.

पोलीस जलतरण तलावाच्या जलतरण पटटू जलतरण तलावाच्या नियमाचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यासाठी पुढील प्रमाणे नियम बनविण्यात आले आहे.

**:- नियम :-**

१. सभासद असलेल्या जलतरण पटटू यांना सरावासाठी सकाळी ०६.०० ते ०७.३० या दरम्यान व संध्याकाळी १६.०० ते २०.०० या वेळेत दोन लेन दिल्या जातील.
२. सुटटीच्या काळात पोलीस अधिकारी व अंमलदार यांची व त्यांच्या पाल्यांचे गर्दीचे प्रमाण जास्त होते. अशा वेळी त्यांना तलावात मुबलक जागा मिळावी यासाठी जलतरण पटटूंना सरावासाठी दिलेल्या वेळेत बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला असेल.
३. जलतरण तलाव येथे फक्त व्यवस्थापन समितीने नेमुण दिलेल्या प्रशिक्षणाकडून प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.
४. बाहेरील प्रशिक्षकास आणून प्रशिक्षण घेणे मनाई आहे.
५. जलतरण पटटूच्या पालकांनी जलतरण तलाव येथे नियुक्त असलेल्या प्रशिक्षकाशी विनाकारण वाद घालू नये. असे दिसून आल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला आहे.
६. जलतरण पटटूंनी जलतरण तलावाचे नाव खराब होईल असे कोणतेही कृत्य केल्यास त्यांचे सभासदत्व रदद करण्यात येईल.
७. खाजगी सभासद असणा-या जलतरण पटटूंना पोलीस जलतरण तलाव येथील प्रशिक्षकाकडून प्रशिक्षण देण्यात यावे किंवा याबाबत निर्णय व्यवस्थापन समिती घेईल.
८. लोहमार्ग मुंबई जलतरण संघटनेत संलग्न राहण्यासाठी स्वताचे रजिस्ट्रेशन शुल्क स्वता भरणे.
९. तालुका, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर होणा-या स्पर्धांचे शुल्क स्वता भरावे.

**मैदान :-**

मुख्यालय घाटकोपर येथील मैदाने भाडे तत्वावर देवून घटक पोलीस कल्याण निधीची वृध्दी होऊ शकते. त्यामूळे या घटकाच्या आस्थापनेवरील मुख्यालय घाटकोपर येथील जलतरण तलावाच्या सभोवताळी असलेले मैदान शासकीय पोलीस अधिकारी व अंमलदार यांना भाडे तत्वावर देण्याकरीता खालील दर्शविल्याप्रमाणे सुधारित दर निश्चित करण्यात येत आहेत.

| तपशिल | दर | अनामत रक्कम | GST १८% | एकूण |
|---|---|---|---|---|
| **कुकरेजा टॉवर लगत असलेल्या जैन मंदिर जवळचे मैदान** | | | | |
| शासकीय अधिकारी / अंमलदार व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या कौटूंबिक कारणास्तव भाडे तत्वावर (पो.शि. ते पोनि.) (मंत्रालयीन लिपीक अधिकारी / कर्मचारी) | रु.५०,०००/- | रु.१०,०००/- | रु.९,०००/- | रु.६९,०००/- |
| खाजगी व्यक्ती यांना भाडे | रु.१,००,०००/- | रु.२५,०००/- | रु.१८,०००/- | रु.१,४३,०००/- |
| विदयालय व महाविदयालयीन क्रिडा स्पर्धेकरीता | रु.५,०००/- | रु.५००/- | रु.९००/- | रु.५,९००/- |
| **वैदयकिय रुग्णालय समोरील मैदान जलतरण तलावासह (पोहण्यास मनाई)** | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शासकीय अधिकारी / अंमलदार व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या कौटूंबिक कारणास्तव भाडे तत्वावर (पो.शि. ते पोनि.) (मंत्रालयीन लिपीक अधिकारी / कर्मचारी) | रु.१,००,०००/- | रु.१०,०००/- | रु.१८,०००/- | रु.१,२८,०००/- |
| खाजगी व्यक्ती यांना भाडे | रु.१,५०,०००/- | रु.२५,०००/- | रु.२७,०००/- | रु.२,०२,०००/- |
| विदयालय व महाविदयालयीन क्रिडा स्पर्धेकरीता | रु.२०,०००/- | रु.७५००/- | रु.३६००/- | रु.२३,६००/- |

- **ॲथलेटिक्स ट्रॅक**

१. ॲथलॅटिक्स मैदानावरील मासिक सभासद नोंदणी करावयाचा कालावधी संपूर्ण महिन्यातील दि.१ ते ५ या तारखेपर्यंत राहिल याची नोंद घ्यावी.

२. सभासद झाल्यानंतर ओळखपत्र दिले जाईल. ओळखपत्रा शिवाय मैदाना मध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

३. स्पोर्ट किट शिवाय मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही. (उदा :- स्पोर्ट शुज / ट्रॅक पॅन्ट / टि-शर्ट)

४. बनियान, लुंगी, पॅन्ट, चप्पल, सॅन्डल व नॉन स्पोर्ट शुज परिधान केल्यास मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही.

५. ॲथलॅटिक्स मैदान सकाळी ०५.०० ते २०.०० पर्यंत चालू राहिल.

६. ॲथलॅटिक्स ट्रॅक फक्त सकाळी ०७.०० ते ०८.०० पर्यंत चालण्यास उपलब्ध राहिल.

७. ॲथलॅटिक्स ट्रॅक करीता खालील दर्शविल्याप्रमाणे फी आकारण्यात येईल.

| | |
|---|---|
| मुंबई लोहमार्ग पोलीस दलात कर्तव्य करीत असलेल्या अधिकारी व अंमलदार यांना स्पोर्ट किट सह उपस्थित राहिल्यास | मोफत<br>**(ओळखपत्र दाखविणे सक्तीचे)** |
| मुंबई लोहमार्ग पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना व त्यांच्या कुटूंबियांना | प्रत्येकी रु.५००/- प्रति महिना<br>प्रत्येकी रु.५,०००/- वार्षिक |
| पोलीस भरतीसाठी इच्छुक उमेदवार (फॉर्मची प्रति / ID सह) | प्रत्येकी रु.५००/- प्रति महिना |
| इतर पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांना व त्यांच्या कूटूंबियांना | प्रत्येकी रु.७५०/- प्रति महिना<br>प्रत्येकी रु.७,५००/- वार्षिक |
| खाजगी व्यक्ती व त्यांच्या कूटूंबियांना | प्रत्येकी रु.१०००/- प्रति महिना<br>प्रत्येकी रु.१०,०००/- वार्षिक |
| जिल्हास्तरीय / राज्यस्तरीय / आंतर राष्ट्रीय स्तरावरील / शाळेय क्रिडा स्पर्धेतील प्राविण्य प्रमाणपत्र असलेल्या खेळाडूंकरीता | रु.१००/- प्रति महिना<br>रु.१,०००/- वार्षिक |

८. मासिक सभासद नोंदणीसाठी ओळखपत्र, रहिवाशी पुरावा, आधारकार्ड, दोन फोटो (पासपोर्ट साईज) व शासकीय ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

९. मासिक शुल्क आकारुन देण्यात येणारा प्रवेश हा फक्त वैयक्तीक खेळासाठी असून सदर मासिक शुल्क व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण शुल्क घेतले जाणार नाही व प्रशिक्षण दिले जाणार नाही.

१०. प्रत्येक रविवारी क्रिडा संकुल बंद राहिल.

११. शासकीय कारणास्तव मैदानाची आवश्यक्ता भासल्यास सभासदांना मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही.

१२. चालण्यासाठी येणा-या सभासदांना फुटबॉल मैदानावर प्रवेश दिला जाणार नाही.

१३. दैनंदिन सरावाच्या वेळी सभासदाने मौल्यवान वस्तु बाळगु नये. तसेच इतर आवश्यक साहित्य स्वत:च्या जबाबदारीने सांभाळावे लागेल. साहित्य अगर वस्तू गहाळ झाल्यास क्रिडा संकुल व प्रशासन जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

१४. फुटबॉल मैदानावरील फुटबॉल स्टड हे फुटबॉल असोशिएशन ऑफ इंडिया यांचे नियमानूसार असावे.

१५. वरील नियमाचे पालन न केल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीला राहिल.

१६. फुटबॉल मैदान / सिंथेटिक ट्रॅक फक्त खेळ व खेळाच्या स्पर्धांसाठी भाडे तत्वावर मिळण्यासाठी मैदान व्यवस्थापक समिती यांच्याशी संपर्क साधावा.

**१७.** क्रिडा संकुलातील मैदान खालील दर्शविल्याप्रमाणे भाडे तत्वावर देण्यात येईल.

| तपशिल | दर | अनामत रक्कम | GST १८% | एकूण |
|---|---|---|---|---|
| शालेय / महाविदयालय यांच्याकरीता प्रति दिन भाडे | रु.५००००/- | रु.२५,०००/- | रु.९०००/- | रु.८४०००/- |
| खाजगी क्रिडा स्पर्धेकरीता प्रति दिन भाडे | रु.१०००००/- | रु.२५,०००/- | रु.१८०००/- | रु.१४३०००/- |

(मा.पोलीस आयुक्त यांच्या मान्यतेने)

**Sd/-**
(शहाजी निकम)
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांचेकरीता